माहितीचा अधिकार

**राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ नागपूर**
**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये**
**प्राप्त झालेले व्दितीय अपील**

**अपील क्रमांक : २७८७/२०१९**

**अपिलार्थी, श्री. शैलेंद्र नारायणदास झाडे,**
रा. गांधी गेट, महाल, नवी शुक्रवारी रोड, नागपूर-४४००३२

**विरुध्द**

**जन माहिती अधिकारी तथा तलाठी,**
साझा क्र.२३, आमडी ता. पारशिवनी जि. नागपूर

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा मंडळ अधिकारी,**
आमडी ता. पारशिवनी जि. नागपूर

**आदेश पारित दिनांक : ०१.०२.२०२१**

अपिलार्थी यांनी **दिनांक १६.१०.२०१९ रोजी** माहितीचा अधिकार अधिनियम २००५ चे कलम १९(३) नुसार आयोगाचे स्तरावर व्दितीय अपील अर्ज दाखल केला. त्याची आयोगाचे स्तरावर रीतसर नोंदणी करण्यात आली. आयोगाकडे दाखल केलेल्या प्रस्तुतच्या व्दितीय अपील अर्जाच्या अनुषंगाने आयोगाकडून जा.क्र. ४३२४/२०२०, दि. १२.११.२०२० रोजीच्या पत्रान्वये ई-मेल व्दारे उत्तरवादींना नोटीस देवुन त्यांचे खुलासे मागविण्यात आले. त्यानुसार उत्तरवादी यांचेकडून खुलासे प्राप्त झाले. त्याअनुषंगाने आज दिनांक ०१.०२.२०२१ रोजी सुनावणी घेण्यात आली. सदर सुनावणीस अपिलार्थी उपस्थित आहेत. विद्यमान जन माहिती अधिकारी तथा तलाठी, श्री. एम.व्ही. बांगर उपस्थित आहेत. तसेच विद्यमान प्रथम अपिलीय अधिकारी तथा मंडळ अधिकारी, श्री. बी.जी. जगधने उपस्थित आहेत.

प्रकरणाची वस्तुस्थिती तपासली असता, अपिलार्थी यांनी **दिनांक २३.०४.२०१९ रोजी** केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम ६(१) नुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे माहिती अर्ज सादर करुन त्यात त्यांनी "मौजा-आमडी त.सा.क्र. २३, ता. पारशिवनी जि. नागपूर येथील शेत सर्वे नं.५३ व ४९/२ चे संबंधात मा. तहसिलदार पारशिवनी यांनी महसुली प्रकरण क्र. रा.मा.क्र. १२/बी.एन.डी. -५४/२०१६-१७ चे अंतर्गत दि. २०.११.२०१७ चे पारित आदेशाने अधिनस्त मंडळ अधिकारी आमडी/तलाठी सा.क्र. २३ यांनी आदेश अंमलबजावणी बाबत केलेल्या कार्यवाहीच्या संपूर्ण अहवालाची संपूर्ण व सर्वच कागदपत्रांसहित माहिती" मागितलेली होती. त्यावर जन माहिती अधिकारी यांनी दिनांक १६.०५.२०१९ च्या पत्रान्वये, अपिलार्थीस माहितीबाबत अवगत केले आहे. तद्नंतर अपिलार्थी यांनी **दिनांक ३१.०५.२०१९ रोजी** कलम १९ (१) नुसार प्रथम अपीलीय अधिकारी यांचेकडे "माहिती पुरविली नाही" असे कारण नमूद करुन प्रथम अपील दाखल केले. त्यावर प्रथम अपिलीय अधिकारी यांनी दिनांक १२.०७.२०१९ रोजी सुनावणी घेवून, जन माहिती अधिकारी तथा तलाठी साझा क्र.२३ आमडी यांनी १५ दिवसांचे आत अपिलार्थी यांना आवश्यक असलेली माहिती संबंधाने शहानिशा करुन मागितलेली माहिती अपिलार्थी यांना विनामुल्य उपलब्ध करुन द्यावी, असे आदेशित केले. तदनंतर अपिलार्थी यांनी **दिनांक १६.१०.२०१९ रोजी** कलम १९(३) नुसार आयोगाकडे व्दितीय अपील अर्ज दाखल करुन "माहिती अर्जानुसार माहिती पुरविण्यातच आली नाही" असा मुद्दा उपस्थित केला आहे.



राज्य माहिती आयोग खंडपीठ नागपूर विभाग महाराष्ट्र ★नागपूर

आज गुगल मीट ॲपवरील ऑनलाईन सुनावणी दरम्यान अपिलार्थी यांनी आयोगासमोर नमूद केले की, मा. तहसिलदार यांच्या दिनांक २०.११.२०१७ च्या आदेशानुसार कोणताही अहवाल तयार केला नाही व त्यानुसार माहिती मिळालेली नाही. त्याअनुषंगाने प्रथम अपिलीय अधिकारी यांनी आयोगास खुलासा केला की, तहसिलदार यांच्या आदेशानुसार तलाठी यांनी अहवाल सादर करावयाचा होता. त्यानुसार तलाठी यांनी दिनांक १०.०७.२०१९ रोजी तहसिलदार यांचेकडे अहवाल सादर केलेला आहे. तसेच प्रथम अपिल अर्जावर विहीत मुदतीत सुनावणी घेवून अपिलार्थी यांच्या माहितीची जन माहिती अधिकारी यांनी शहानिशा करुन अपिलार्थीस माहिती पुरविण्याबाबत आदेशित केले होते. त्यानुसार जन माहिती अधिकारी यांनी दिनांक १०.१०.२०१९ रोजी अपिलार्थीस १ पानाची माहिती दिलेली आहे. त्यावर अपिलार्थी यांनी सदर माहिती मिळालेली नसल्याचे आयोगासमोर कथन केले. त्यामुळे सदर प्रकरणी जन माहिती अधिकारी यांनी पुनश्च: अपिलार्थीस नोंदणीकृत डाकेने माहिती पुरविणे अपेक्षित आहे व त्याची पोच जतन करणे आवश्यक आहे. सबब, केंद्रीय माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९(१०) नूसार खालीलप्रमाणे आदेश पारित करण्यात येतो.

## आदेश

१. सदर प्रकरणी जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस पुनश्च: माहिती तात्काळ नोंदणीकृत डाकेने विनामुल्य पाठविण्यात यावी व तसा अनुपालन अहवाल आयोगास सादर करावा.

२. केंद्रीय माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९(१०) नुसार राज्य माहिती आयोगाने पारित केलेला प्रत्येक आदेश कलम १९(७) नुसार संबंधित सार्वजनिक प्राधिकरणावर निर्धारित वेळेत अनुपालन करण्यासाठी अंतिम व बंधनकारक आहे. जर पारित आदेशाचे अनुपालन न करुन अवमान केल्यास प्राधिकरणाचे संबंधित जबाबदार अधिका-यांविरुध्द भारतीय दंड संहिता, १८६० चे कलम १६६ नुसार फौजदारी कार्यवाही करण्यात येईल, याची नोंद घ्यावी.

३. उपरोक्त आदेशान्वये, प्रस्तूत व्दितीय अपील निकाली काढण्यात येत आहे.

राज्य माहिती आयोग खंडपीठ नागपूर

(संभाजी सरकुंडे)
राज्य माहिती आयुक्त
खंडपीठ नागपूर

जावक क्रमांक 2358 दिनांक 18 AUG 2021